# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :२०/२०२४/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. कैलास मोठाभाऊ भदाणे,<br>रा.मु. पो. उंभर्टी, ता. साक्री, जि. धुळे-४२४३०६. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निकवेल, ता. बागलाण, जि. नाशिक. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**सुनावणी दिनांक १४/०७/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०१/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केलेला होते. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १४/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तर तक्रारदार अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दि. ०३/०१/२०२४ च्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही तसेच, "प्रथम अपिलीय अधिकारीने आदेश देवूनही माहिती न देणाऱ्या, दिशाभूल करणारी व खोटी माहिती देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्तीची कारवाई करावी. अर्जातील विषयानुसार मला आवश्यक असलेली माहिती त्वरित देणेसाठी जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावे. सोबतच मला झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासापोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८)(ख) नुसार रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये) नुकसान भरपाई देण्यात यावी."

३) तक्रारदार यांनी दि. ०७/०६/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे वार्षिक लेखा विवरणे/लेखा परिक्षण अहवालाच्या कॉफीज मिळणेबाबत या विषयाबाबत आर्थिक वर्ष २०१९-२०२२ या कालावधीतील पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती. "वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर लेखा परिक्षकांनी दिलेल्या टिपण्णी वित्तीय काढलेल्या त्रुटी व त्यास ग्रामपंचायतीने दिलेले उत्तर केलेली सुधारणा या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती देणे. सर्व लेखा परिक्षण अहवाल त्या त्या वर्षामध्ये ग्रामसभेत सादर केले असल्याच्या ग्रामसभेच्या ठराव व इतिवृत्ताची छायांकित प्रत देणे. लेखा परीक्षण सादर केलेल्या ग्रामसभेत उपस्थित असणाऱ्या सर्व ग्रामस्तांच्या उपस्थित स्वाक्षरी/अंगठा असलेल्या ग्रामसभा उपस्थित रजिस्टरची छायांप्रत देणे ही सर्व माहिती अधिकाराचा लोगो सहित साक्षांकित करून द्यावी." संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे कारण नमूद करुन तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. ११/०७/२०२३ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

४) सुनावणीपूर्वी तक्रारदार यांनी लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यात दि. ०७/०६/२०२३ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १३/१०/२०२३ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेश पारीत करुन देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मला आजपर्यंत माहिती पुरविली नसल्याचे नमूद केले आहे.

५) सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत), पंचायत समिती, बागलाण यांचेकडे सादर केलेला दि. ११/०७/२०२३ चा प्रथम अपील अर्ज खालील आदेश पारीत करुन दि. १३/१०/२०२३ अन्वये निकाली काढल्याचे दिसून येते. "जन माहिती अधिकारी तथा मा. ग्रामसेवक यांनी माहिती दिली नाही म्हणून अपीलार्थी यांना माहिती देता आली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्रीमती प्रमिला पवार यांनी दोन्ही अर्जात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अधिकारी तथा सात दिवसाचे आत विनामुल्य अपिलार्थी यांना देण्यात यावी.

मात्र, प्रथम अपिल आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही."

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निकवेल, ता. बागलाण, जि. नाशिक यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. १३/१०/२०२३ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

**२)** प्रथम अपील सुनावणीवेळी कार्यरत (दि. १३/१०/२०२३ रोजी कार्यरत) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, निकवेल, ता. बागलाण, जि. नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**३)** वरील निर्देशांसह सदर तक्रार क्र. २०/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र ९८५ 01 JAN 2026